**प्रभावी संनियंत्रण व्यवस्था निर्माण करुन निविदा विषयक अधिकारांचे विकेंद्रीकरण करणेबाबत.**

**<u>महाराष्ट्र शासन</u>**

**जलसंपदा विभाग**

**शासन निर्णय क्र निविदा-१२१३/प्र.क्र. (७३५/२०१३)/मोप्र-१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ७ सप्टेंबर, २०१५

<u>वाचा</u>:- १) शासन पत्र क्र.निविदा ०४०५/८८/व्हीआयपी/ (२७५/२००५) दि.२०/०५/२००५
२) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१०/ (१६८/२०१०) मोप्र-२ दि.३/४/२०१०
३) शासन पत्र क्र.निविदा -०८१२/(४७६/२०१२) मोप्र-१,दि.३१/०८/२०१२
४) शासन परिपत्रक क्र. निविदा-०८१२/(४२०/२०१२)/ मोप्र-१ दि.११/१०/२०१२
५) शासन पत्र क्र. निविदा-१२१३/७३५/२०१३/ मोप्र-१ दि.१०/१०/२०१४

**<u>प्रस्तावना</u>:-**

पाटबंधारे विकास महामंडळे स्थापन झाल्यानंतर सर्व स्तरावरील अभियंत्यांना महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियामवलीनुसार प्राधान केलेल्या शक्ती / अधिकार इत्यादिच्या वापरावर काही प्रमाणात बंधने आल्याचे निदर्शनास येते कारण सर्वसाधारणपणे महत्वाच्या बाबतीत निर्णय प्रक्रियांचे केंद्रीकरण झाले आहे. त्यामुळे अधिकाराचा संकोच पण जबाबदारीत मात्र वाढ अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच निविदापूर्व मान्यता, दायित्व मान्यता या बाबींवर बराच कालापव्यय होतो. बऱ्याच प्रकरणी बांधकामाच्या हंगामातील दिवस या प्रक्रियेत वाया जातात. परिणामी दिलेली भौतिक उदिष्टे साध्य करण्यास अडचणी निर्माण होतात असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर प्रभावी संनियंत्रण व्यवस्था निर्माण करुन निविदा प्रक्रियेबाबतच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करणे शासनाचे विचाराधीन होते.

त्यानुसार संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये प्रकल्पांतर्गत कामासाठीच्या निविदांना कार्यारंभ आदेश देणे, निविदेस सांकेतांक क्रमांक मंजूरी व निविदेवरील दायित्वास मान्यता देणेबाबतची कार्यपध्दती इत्यादिबाबतचे दिलेले आदेश संदर्भ क्र. ५ च्या पत्रान्वये अधिक्रमित करुन प्रकल्पांच्या दायित्वावर प्रभावी नियंत्रण राखण्याच्या दृष्टीने सर्व सिंचन महामंडळांनी नियामक मंडळाच्या मान्यतेने सुयोग्य कार्यपध्दत निश्चित करावी असे कळविण्यात आले होते. या अनुषंगाने काही सिंचन महामंडळांनी ठराव पारित करुन शासनास सादर केले आहेत.

आता संदर्भ १ व ५ अधिक्रमित करुन सर्व सिंचन महामंडळात सारखीच कार्यप्रणाली असण्याच्या दृष्टीने महामंडळांच्या अधिनियमातील अनुच्छेद क्र. २५ अन्वये शासनास प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**<u>शासन निर्णय:-</u>**

१. **आर्थिक नियोजन व प्रापणसूचीस मान्यता देणे:-** प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस प्रशासकीय मान्यता /अद्यावत सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीच्या मर्यादेत तसेच सिंचन वर्षाची भौतिक उद्दिष्टे ( प्रकल्प पूर्ण करणे, पाणीसाठा करणे, सिंचन क्षमता निर्माण करणे, कामांची सलगता आणि प्राध्यान्यक्रम ) विचारात घेऊन प्रकल्प निहाय उपलब्ध निधीचा पूर्ण विनियोग

होण्यासाठी उपलब्ध निधीच्या १.५० पट खर्चाचे नियोजन कार्यकारी संचालकाचे स्तरावर करण्यात यावे. सदर नियोजन करतांना चालू निविदेवरील प्रलंबित दायित्व,चालू निविदांवर विचाराधीन आर्थिक वर्षात भौतिक उदिष्टपूर्तीसाठी प्रस्तावित खर्च, भूसंपादनाचा प्रस्तावित खर्च, विद्युत / यांत्रिकी विभागास द्यावयाच्या रकमा व नविन निविदेवरील अपेक्षित खर्च विचारात घेण्यात यावा. मात्र नियोजन अंतिम करतांना सिंचन वर्षातील भौतिक उदिष्टांना प्रथम प्राधान्य दयावे. मंजूर प्रकल्प अहवाला बाहेरील प्रकल्प घटकांचा नियोजनात व प्रापण सूचीत आंतर्भाव करु नये. नियोजनानुसार नविन निविदांसाठी उपलब्ध होणारी तरतूद व वर्षातील भौतिक उदिष्टांचा विचार करुन आवश्यकतेनुसार नवीन निविदांची प्रापणसूची तयार करण्यात यावी.वरील प्रमाणे प्रकल्पवार खर्चाचे नियोजन व प्रापणसूची कार्यकारी संचालकांनी मंजूर करावी. मोठया व मध्यम प्रकल्पांचे बाबतीत मंजूर नियोजनाची व प्रापणसूचीची प्रत नियामक मंडळाचे अवलोकनार्थ सादर करावी. एखादया अपवादात्मक परिस्थितीत भौतिक उदिष्टये साध्य करण्यासाठी प्रापणसूची बाहेरील निविदा काढण्याची आवश्यकता निर्माण झाल्यास अशा प्रस्तावांना प्रथम कामाची निकड व सदर काम प्रापणसूचीत का अंतर्भूत होवू शकले नाही याची कारणमिमांसा विचारात घेऊन कार्यकारी संचालकयांनी मान्यता द्यावी. तथापि, अशी मान्यता देतांना वार्षिक आर्थिक नियोजनाच्या मर्यादेचे पालन करण्यात यावे. आर्थिक नियोजनाच्या मर्यादेबाहेरची निविदा काढणे आवश्यक असल्यास याबाबतची निकड विषद करुन सुधारित प्रशासकीय मान्यता देणेस सक्षम प्राधिकरणाची पूर्व मान्यता घ्यावी. तसेच मंजूर प्रकल्प अहवाला बाहेरील प्रकल्प घटकाचा नियोजनात अंतर्भाव करणे अनिवार्य असल्यास त्यासही सुधारित प्रशासकीय मान्यता देणेस सक्षम प्राधिकरणाची पूर्वमान्यता घ्यावी.

मंजूर प्रापणसूचीतील किंवा अपवादात्मक परिस्थितीत प्रापणसूची बाहेरील कार्यकारी संचालकांनी मान्यता दिलेल्या कामाबाबत निविदापूर्व मान्यता घेण्याची गरज नाही. मात्र निविदा काढण्यापूर्वी प्रकल्पास आवश्यक वैधानिक मान्यता प्राप्त असणे व कामासाठी आवश्यक जमिन ताब्यात असणे अनिवार्य राहील. तसेच कोणतीही निविदा सविस्तर सर्वेक्षण अन्वेषण व सविस्तर संकल्पचित्रावर आधारित अंदाजपत्रकास सक्षम स्तरावरुन तांत्रिक मान्यता असल्याशिवाय काढू नये.

२. **निविदा स्विकृती :-**वरील परिच्छेद क्रमांक १ मधील कार्यवाहीच्या अधीन सर्व निविदा स्विकृतीची कार्यवाही महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील तसेच प्रचलित शासन निर्णय/परिपत्रकातील तरतूदीनुसार सक्षम स्तरावर म्हणजेच कार्यकारी अभियंता/ अधीक्षक अभियंता/मुख्य अभियंता स्तरावर स्विकारुन काम सुरु करण्याचे आदेश देण्यात यावेत.

काम सुरु करण्याच्या आदेशाची प्रत महामंडळास प्राप्त झाल्यानंतर त्याआधारे कार्यकारी संचालकांच्या स्तरावरुन ८ दिवसांच्या कालमर्यादेत देयक अदायगीसाठी आवश्यक असणारा सांकेतांक क्रमांक देण्यात यावा. सांकेतांक नसणा-या कोणत्याही कामास निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही याची जबाबदारी कार्यकारी संचालकांची राहिल.

३. वरील परिच्छेद १ व २ बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कार्यकारी संचालक यांनी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक व अध्यक्ष यांच्या माहितीसाठी वेळोवेळी सादर करावा तसेच नियामक मंडळाच्या आगामी बैठकीमध्ये अवलोकनार्थ सादर करावा.

वरील निर्देश सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपब्लध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१५०९०८११५३५७५९२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने.

**( र.ए.उपासनी )**
**शासनाचे उप सचिव**

**प्रत,**

१) महालेखापाल ½(लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)महाराष्ट्र राज्य ,मुंबई/नागपूर
२) खाजगी सचिव, मा.मंत्री, जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई
३) खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री, जलसंपदा व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई
४) मा.विधानसभा /विधानपरिषद सदस्य सर्व
५) स्वीय सहाय्यक, प्रधान सचिव(जसं), जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई
६) स्वीय सहाय्यक, सचिव(लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई
७) स्वीय सहाय्यक, मुख्य अभियंता (दवप्र) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई
८) स्वीय सहाय्यक, मुख्य अभियंता (जसं) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई
९) स्वीय सहाय्यक, मुख्य अभियंता (कृपातलं) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई
१०) स्वीय सहाय्यक, मुख्य अभियंता (पा.) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई
११) सर्व तांत्रिक उपसचिव/अवर सचिव/उपअभियंता, जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई
१२) सर्व कार्यकारी संचालक
१३) महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक
१४) महासंचालक, जल व भूमी व्यवस्थापन, औरंगाबाद
१५) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,
१६) सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग,
१७) सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग,

प्रत:- मोप्र-१ कार्यासन संग्रहार्थ.